


# विदर्भ प्रजासत्ताक



RNI No. MAHMAR 2023/84526

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२२ जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# रामो राजमणिः सदा विजयते! पंतप्रधान मोदींच्या हस्ते रामललाची प्राणप्रतिष्ठा; जगाने पाहिला अभूतपूर्व सोहळा

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

गेली कित्येक शतके ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहिली गेली, संघर्ष केला, तो क्षण अखेर अवघ्या जगाने अनुभवला. अयोध्येत राम मंदिराचा संकल्प पूर्ण झाला. २२ जानेवारी २०२४ रोजी अत्यंत शुभ मुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राम मंदिराचे लोकार्पण करण्यात आले. या सोहळ्याच्या निमित्ताने भारतासह अवघे जग राममय झाले. रामनामाचा जयघोष मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्यपाल आनंदीबेन पटेल, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मोहन भागवत आणि अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रामलला प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राम मंदिरात आगमन होताच शंखनाद करण्यात आला. सनई चौघडे वाजवण्यात आले. पाच मंडपातून पंतप्रधान मोदी राम मंदिराच्या गाभाऱ्यात आले. यानंतर पंतप्रधान मोदी यांनी प्राणप्रतिष्ठा पूजेची सुरुवात करण्यात केली. प्राणप्रतिष्ठा




पूजेचा संकल्प करण्यात आला. गणपती पूजन करून रामललाचे पूजन, प्राणप्रतिष्ठा, अभिषेक करण्यात आला. यानंतर पंतप्रधान मोदी यांनी चांदीचा एक मुकूट श्रीरामचरणी अर्पण केला. प्रभू रामचंद्रांची आरती करण्यात आली. राजस सुकुमार असेच रामललाचे स्वरुप भावले. रामललांना विविध प्रकारची फुले, हार, रत्नजडीत अलंकार अर्पण करण्यात आले. हेलिकॉप्टरमधून राम मंदिरावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

दरम्यान, सोनू निगम, अनुराधा पौडवाल, शंकर महादेवन यांनी सुरुवातील रामनामाची स्तुती करणारी गीते सादर केली.

## दिग्गज, मान्यवरांची लाभली उपस्थिती

श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सर्व मान्यवर उपस्थित होते. या विशेष सोहळ्यात सहभागी होण्यासाठी देश-विदेशातील सुमारे ७१४० हजार पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले. अमिताभ बच्चन, रजनीकांत, हेमा मालिनी, माधुरी दीक्षित, कंगना रणौत, अरुण गोविल, नितीश भारद्वाज, मधुर भांडारकर, कतरिना-विकी कौशल यांच्यासह बॉलिवूडमधील अनेक सेलिब्रिटी या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित होते. तसेच सचिन तेंडुलकर, अनिल कुंबळे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहिले. उद्योगपती मुकेश अंबानी, मुकेश अंबानी यांच्यासह उद्योगजगतातील मान्यवर उपस्थित होते. बागेश्वर बाबा यांच्यासह साधू-संत, महंत यांची विशेष उपस्थिती होती.

# राज्य सरकारच्या निर्णयाला केराची टोपरी दाखवीत भरवली शाळा

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक बडनेरा**

अयोध्येत होणाऱ्या राम मंदिराच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून हा निर्णय घेण्यात आलाय. यामध्ये २२ जानेवारी रोजी शाळा, महाविद्यालयं आणि कार्यालयं बंद राहणार आहेत दरम्यान केंद्रीय कर्मचाऱ्यांना हाफ डे देण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर राज्य सरकारकडून सुट्टी जाहीर करण्यात आलीये. सध्या संपूर्ण देशात राम मंदिराच्या उद्घाटनाचा उत्साह पाहायला मिळतोय. त्याचसाठी राज्य सरकारकडून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलाय.असला तरी मात्र बडनेरा येथील सेन्स्ट फ्रांसिस स्कुल ने राज्य सरकारच्या निर्णयाला केराची टोपरी दाखवीत शाळा भरवली याची तक्रार काही पालकांनी भाजप प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांच्या कडे केल्यानंतर त्यांनी थेट शाळेत जात परिस्थिती



पाहली असता त्या ठिकाणी विद्यार्थी आढळून आले यावर कुळकर्णी यांनी फादर यांच्या सोबत चर्चा केली असता त्यांनी उडवा उडवी चे उत्तरे दिलीत मात्र त्यानंतर शाळेला सुरु देण्यात आली. आता या शाळेची रतिसर तक्रार करण्यात येणार असून शिक्षण विभागातर्फे काय कारवाई या शाळेवर होते या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# 'ही' तर भारताच्या नव्या अस्मितेची सुरुवात : देवेंद्र फडणवीस



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अयोध्येत ऐतिहासिक सोहळा सुरू असताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात रामपूजन केले. हा दिवस भारतीय अस्मितेची नवी सुरुवात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

आजचा दिवस ऐतिहासिक आहे. भारतीय अस्मितेचा हा संघर्ष होता. आजचा दिवस पाचशे वर्षातील सर्वात पवित्र व ऐतिहासिक दिवस आहे. ती मशीद नव्हती तर कलंकाचा ढाचा होता. राजकीय स्वातंत्र्य मिळाले होते पण अध्यात्मिक स्वातंत्र्य नव्हते. ज्या देशात भूतकाळाच्या गौरवाचे पूजन होत नाही त्याचा वर्तमानकाळ तर असतो पण भविष्यकाळ नसतो. मला रामसेवेत सहभागी होता आले ही धन्यता. आज स्वप्नपूर्तीचा अनुभव येतो आहे.

पंतप्रधान नरेंद मोदी यांनी लाखो संतांची इच्छा व स्वप्न पूर्ण केले. देश आनंदात असताना काही।लोक आम्ही अयोध्येत जाणार नाही अशी भूमिका घेतली. त्या लोकांनी रामाला काल्पनिक म्हटले होते. राम म्हणजे न्याय, अयोध्येसोबत न्याय झाला. लवकरच सगळ्यांना अयोध्येत जायचे आहे. हे केवळ मंदिराचे निर्माण नसून भारताच्या नवीन अस्मितेची सुरुवात आहे असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**फडणवीस यांनी सादर केले गीत**

यावेळी हजारो लोकांसमोर फडणवै यांनी 'जागो तो एक बार जागो जागो तो' हे गाणे सादर केले. नागरिकांनी त्यांना उत्स्फूर्तपणे साथ दिली.

# आपले रामलला आता तंबूत राहणार नाहीत; प्राणप्रतिष्ठेनंतर पंतप्रधान मोदी भावुक


**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या**

अयोध्येतील राम मंदिरात रामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली आहे. ५०० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आज भगवान श्रीराम त्यांच्या भव्यदिव्य मंदिरात विराजमान झाले आहेत. हजारो क्विंटल फुलांनी अयोध्या नगरी सजवण्यात आली आहे. देशभरात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या. आज आपले राम आले आहेत असं म्हणत मोदींनी भाषणाची सुरुवात केली. २२ जानेवारी ही कॅलेंडरवर लिहिलेली एक तारीख नाही. हा नवीन कालचक्राचा उगम आहे.

शतकानुशतकांच्या प्रतीक्षेनंतर आज आपले राम आले आहेत. या शुभप्रसंगी सर्व देशवासियांना हार्दिक शुभेच्छा. माझा कंठ दाटून आला आहे, माझं मन अजूनही त्या क्षणात गढून गेले आहे. आमचे रामलला आता तंबूत राहणार नाहीत, आता रामलला दिव्य मंदिरात राहणार आहेत. शतकानुशतकांच्या प्रतीक्षेनंतर आपले राम आले आहेत. त्याग आणि तपश्चर्येनंतर आपले राम आले आहेत असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

**मी जी अनुभूती घेतली ती शब्दांमध्ये सांगता येणार नाही**

मी आत्ताच अयोध्येतील मंदिराच्या गाभाऱ्यातून ईश्वरच्या चेतनेचा साक्षीदार होऊन



तुमच्यासमोर उभा राहिलो आहे. आजचा जो क्षण आहे त्याबाबत अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. पण कंठ दाटून येतोय. माझं शरीर अजूनही स्पंदीत आहे. मन अजूनही त्या क्षणांमध्ये लीन आहे. आपले रामलल्ला आता तंबूत राहणार नाहीत. आपले रामलल्ला आता दिव्य मंदिरात राहतील. माझा पूर्ण विश्वास आहे, अपार श्रद्धा आहे, मी जो अनुभव घेतला त्याची अनुभूती देशातील विश्वाच्या कोपऱ्यातील रामभक्तांना होत असेल. हा क्षण अलौकीक आहे. आजचा क्षण पवित्र आहे. अयोध्येतला माहोल, वातावरण हे सारंकाही प्रभू रामाचा आपल्या सर्वांवर आशीर्वाद आहे. २२ जानेवारी २०२४चा हा सूर्य अद्भूत आभा घेऊन आला आहे. ही कॅलेंडरवरील तारीख नाही. ही एका नव्या कालचक्राची सुरुवात आहे. राम मंदिराच्या भूमीपूजनानंतर प्रत्येक दिवस संपूर्ण देशात उमंग आणि उत्साह वाढत जात होता. आज त्या उत्साहाचं रुप मी समोरही पाहू शकतो आहे.

**आता नवराष्ट्र निर्मिती होणार**

आपल्या अनेक पिढ्यांनी जे धैर्य दाखवलं त्या धैर्याचा वारसा आज आपल्याला मिळाला आहे. गुलामीची मानसिकता तोडून आपण नवराष्ट्र निर्मिती करतो आहोत. अशाच प्रकारे नवा इतिहास लिहिला जातो. आजपासून एक हजार वर्षांनीही आजचीही तारीख लक्षात ठेवतील. ही रामाचीच कृपा आहे. आज आपण सगळे हा क्षण आपण जगतो आहोत, आपण पाहतो आहोत. आजचा दिवस, दिशा सगळं काही दिव्य झालं आहे. ही वेळ सामान्य नाही. कालचक्रावर केलेली स्मृतीची अमिट स्मृती आहे. आपल्याला सगळ्यांन ठाऊक आहे की रामाचं काम जिथे असतं तिथे पवनपुत्र हनुमानही विराजमान असतात. मी आज रामभक्त आणि हनुमानगढीलाही प्रणाम करतो. असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले आहेत.

# जय श्रीराम... आज कारसेवकांचे आत्मे सुखावले; राज ठाकरेंचे भावूक उद्गार

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

आज अयोध्येत मोठ्या उत्साहात श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा सुरू आहे, देशभरात या सोहळ्याचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. देशातील व्हिआयपी या सोहळ्यासाठी अयोध्येत पोहोचले आहेत. दरम्यान, मनसे प्रमुख राजव ठाकरे यांनी ट्विट करून भावूक झाले आहेत. ठाकरे यांनी एका वाक्यात ट्विट केले आहे.

मनसो प्रमुख राज ठाकरे यांनी ट्विट करुन अयोध्येत राम मंदिरासाठी ज्या कार सेवकांनी लढा उभारला त्यांच्या आठवणी जागवल्या आहेत. आज कारसेवकांचे आत्मे सुखावले आणि ३२ वर्षांनी शरयू नदी हसली ! जय श्रीराम !, असं भावूक ट्विट राज ठाकरे यांनी केले आहे.

**परदेशातही राम मंदिर सोहळ्याची धूम**

भारतातील राम मंदिर सोहळ्याची धूम परदेशातही



पाहायला मिळत आहे. संपूर्ण भारतात जय श्रीराम असा रामनामाचा जयघोष मोठ्या प्रमावर होत आहेत. केवळ भारतात नाही, तर परदेशातील रामभक्तांमध्ये राम मंदिर सोहळ्याचा उत्साह पाहायला मिळत आहे. राम मंदिर सोहळ्याच्या निमित्ताने अनेकविध कार्यक्रम परदेशातही आयोजित करण्यात आले होते. राम मंदिर सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील टाइम्स स्क्वेअर येथे लाडू-पेढे वाटण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

केवळ अमेरिका नाही तर, कॅनडा, दुबई, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलँड यासह अनेकविध ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेय. सुंदरकांड तसेच रामचरितमानस यांचे पठण केले जात आहे. शोभायात्रा, रॅली काढल्या जात आहेत. ओव्हरसिज फ्रेंड्स ऑफ राम मंदिर या संस्थेच्या सदस्यांनी न्यूयॉर्क येथील टाइम्स स्क्वेअर येथे लाडू वाटून राम मंदिर सोहळ्याचा आनंद साजरा करण्यात आला.



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे अंबा नगरी, बेलोरा विमानतळ अमरावती येथे भाजपा शहर जिल्हा अध्यक्ष आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी स्वागत केले

# सर्वोच्च न्यायालयाने बजावली उद्धव ठाकरेंच्या याचिकेवर नोटीस

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी शिवसेना आमदार अपात्रतेवरील दिलेला निर्णय न्यायालयीन प्रक्रियेत सापडला आहे. शिंदे गटाने उच्च न्यायालयात तर ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयाच या निर्णयाचा आव्हान देत याचिका दाखल केल्या होत्या. यावर उच्च न्यायालयाने नोटीसा पाठविलेल्या असताना आज सर्वोच्च न्यायालयानेही नोटीसा पाठविल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला 'खरी' शिवसेना घोषित करण्याच्या विधानसभा अध्यक्षांच्या आदेशाविरोधात उद्धव ठाकरे गटाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली आहे.



ठाकरे गटाच्या आमदारांना का अपात्र ठरविले नाही, या मुद्द्यावरून शिंदे गटाने नार्वेकरांच्या निर्णयाला याचिकेद्वारे आव्हान दिले आहे. यावर मुंबई उच्च न्यायालयात ८ फेब्रुवारीला सुनावणी घेतली जाणार आहे. यामुळे आता नार्वेकरांनी दिलेल्या निर्णयांवर दोन ठिकाणी वेगवेगळी सुनावणी घेतली जाणार आहे.

**ठाकरे गटाची याचिका काय?**

राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेची २०१८ ची घटना विचारात घेता येणार नसल्याचे म्हटले होते. यामुळे उद्धव ठाकरेंच्या पक्ष प्रमुख पदासह अनेक गोष्टी १९९९ च्या बाळासाहेब ठाकरेंनी निवडणूक आयोगाकडे दाखल केलेल्या घटनेनुसार ग्राह्य नसल्याचे म्हटले होते. तसेच शिवसेना पक्ष एकनाथ शिंदेंचाच असल्याचा निकाल दिला होता. शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरविता येणार नाही असेही म्हटले होते. तसेच ठाकरे गटाच्या आमदारांनाही अपात्र न करण्याचा निर्णय नार्वेकरांनी घेतला होता. तसेच शिंदे गटाच्या शिवसेनेच्या भरत गोगावलेंची प्रतोदपदी नियुक्ती वैध ठरविली होती. जी नार्वेकरांकडे याचिकांची सुनावणी व निर्णय सोपविताना सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविली होती. यावरून ठाकरे गटाने याचिका दाखल केली आहे.

## संपादकीय ......

# संस्कृती आणि त्याची दशा फार वाईट

बदल हा निसर्गाचा नियम आहे आणि तो थांबवणे आपल्या हाती नाही . मात्र त्या बदलामुळे आपण कसे बदलत जातो आणि त्यातून निर्माण होणारा समाज मात्र संस्कृतीची दशा ठरवीत असतो. या बदलाचे परिणाम सकारात्मक होण्यासाठी दिशा गवसने क्रमप्राप्त ठरते आणि हीच दिशा देण्याचा प्रयन्त बाबासाहेब खापर्डे व्याख्यान मालेतून सतीश फडके यांनी केला. बदललेली संस्कृती सांगत असतांना त्याची दशा फार वाईट झालीय हे वाक्य आपल्यापैकी प्रत्येक जण बोलत असतो कारण आपल्याला त्याची दशा दिसते पण एकदा का त्याची दिशा गवसली तर त्या बदललेल्या संस्कृतीला पण सकारात्मक रूप देता येईल असे फडके सरांना ऐकल्यावर वाटले. प्रत्येकवेळी जून ते सोनं अस म्हणून त्या बुरसटलेल्या गोष्टीना आपण उराशी धरू शकत नाही किंवा जुन ते सगळं टाकाऊ असंही म्हणून चालणार नाही. मग त्यातून आपल्यालाच शोधावं लागेल की टाकाऊ काय आहे , टिकाऊ काय आहे . या बदलत गेलेल्या संस्कृतीचा काही भाग टाकाऊ असेल तर तो टाकल्या गेलाच पाहिजे पण जी संस्कृती आपल्याला माणूस म्हणून जगायला शिकविते ती टाकून नाही चालणार. तिला उराशी बाळगून त्याची पाळेमुळे नवीन पिढीपर्यंत आपल्याला पोहचवावी लागेल. बोलणे , चालणे , शिक्षण , एव्हडच नाही तर कपडे देखिल आपली संस्कृती दाखवतात . बदलत्या काळानुसार कपडे कसे घालावे हा ज्याचा त्याचा चॉईस आहे . आपल्याला कम्फर्टेबल वाटतील असे कपडे नक्कीच घालावे पण ते कपडे घातल्यावर बघणाऱ्याला देखील कम्फर्टेबल वाटावे ही भावना मनात ठेवून केलेला पोशाख ही खरी संस्कृती. डिजिटल इंडिया ही एक संस्कृती आहे पण हे डिजिटलायझेशन होण्यामागची भूमिका लक्षात घेऊन केला गेलेला वापर ही सकारात्मत संस्कृती दर्शविते. अनेक गोष्टी बदलत जातात तशी माणसं बदलतात त्याच वागणं, बोलणं बदलते. पण मी एक समाज घटक आहे माझी माझ्या कुटुंबाप्रति, समाजाप्रती, राष्ट्रप्रति काही कर्तव्य आहेत , एक जबाबदार नागरिक म्हणून माझी या समाजात भूमिका काय आहे हे भान प्रत्येकाला जपणे गरजेचे आहे. संस्कृतीची पाळेमुळे ही कुटुंबातून रुजविल्या जातात त्यामुळे कुटुंबातील प्रत्येक जेष्ठाने लहानांची किती चांगल्या प्रकारे जडणघडण होऊ शकेल याकडे जातीने लक्ष देऊन घरातील त्यांचा वावर त्या प्रमाणे असावा. घटस्पोट ही नवीन संस्कृती जन्माला आली आहे .त्यामागील कारण मात्र अतिशय शुल्कक असते ते जर नवीन पिढीने समजून घेतले तर ही संस्कृतीला लागलेली घटस्फोटाची कीड आपण काढू शकू. नवरा बायको हे अनादी काळापासून असलेलं सुंदर नातं ज्यात रुसवा आहे , भांडण आहे पण त्याच बरोबर प्रेम आहे आणि प्रेम म्हटलं की स्वीकार आलाच. मग कितीही भांडण झाले तरी स्वीकाराचा भाव येतो एकमेकांना माफ करून रोज पुन्हा नव्याने संसार सुरू होतो आणि प्रेमाचा दुसरा प्रतीक म्हणजे माघार घेणे आजच्या नवीन पिढीत नवरा बायको दोघेही पगारी . त्यामुळे हम किसींसे कम नहीं हा अहं भाव येतो कुणी माघार घ्यायला, झुकायला तयार नसते. स्वावलंबी असणे चांगले , नोकरी करणेही उत्तमच पण जर का त्या नोकरीचा पगार डोक्यात गेला त्यातून जन्माला येते ती घटस्पोट संस्कृती. दिवसाघडी बदल होणार पण त्या बदलणाऱ्या संस्कृतीची दशा बघून रडत राहण्या पेक्षा त्याला दिशा कशी देता येईल याचे विचारमंथन होणे अपेक्षित आहे आणि त्यासाठी सक्षम पिढी घडवणारा शिक्षक याने ते दिशा देण्याचे काम करायला हवे असे प्रतिपादन फडके सरांनी केले .अतिशय संवेदनशील विषय पण इतक्या मनोरंजक पद्धतीने त्यांनी मांडला की हसता हसता तो हृदयाला कसा भिडला कळले देखील नाही . हे पसायदान नूतन विदर्भ संस्था द्वारा संचालित महिला महाविद्यालयात बाबासाहेब खापर्डे व्याख्यान मालेच्या शेवटच्या पुष्पात घ्यावयास मिळाले . विचारांची प्रगल्भता असणारे प्राचार्य डॉ अविनाश मोहरील सर व त्याच्या महाविद्यालयाच्या सम्पूर्ण टीम ने इतका छान योग घडवून आणला आणि फडके सरांसारख्या महान वक्त्याला ऐकता आले खूप छान वाटले. रसिकांना साठी ही एक पर्वणी ठरली.

# संत अच्युत महाराज जन्मशताब्दीचा शुभारंभ

## १०८ कुंडी विराट गायत्री महायज्ञ, सचिन देव महाराज अयोध्येसाठी रवाना



**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक वरुड,–** श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी महोत्सवाचा शुभारंभ हभप सचिन देव महाराज यांच्या श्रीमद भागवत कथा उद्बोधनाने असंख्य भाविकांच्या उपस्थितीत शनिवारी झाला. तत्पूर्वी १०८ कुंडी गायत्री महायज्ञ सुरू झाला. तो तीन दिवस चालणार आहे.

यावेळी श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी महोत्सव समितीचे अध्यक्ष सुधीर दिवे, संत अच्युत महाराज हार्ट हास्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, डॉ. आशिष धर्माळे, दिनकर बेंडे, श्री संत अच्युत महाराज जन्मशताब्दी महोत्सव समितीचे उपाध्यक्ष मनोज वाडेकर, डॉ. विजय देवळे, हभप रायजी प्रभु शेलोटकर, सुधीर जोशी, राम केळापुरे, किशोर सावरकर, अनंत धर्माळे, मुकुंद वाईकर, शुभदा पोतदार, सागर पासेबंद, दत्ता शिंदे व संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

१०८ कुंडी विराट गायत्री महायज्ञात हजारोच्या संख्येने भाविकांनी सहभाग नोंदविला. गायत्री शक्तिपीठ, सारणी व वरुड गायत्री परिवारने महायज्ञाचे संचालन केले. यज्ञांचे मुख्य यजमान सुधीर दिवे, धनश्री दिवे होते. त्यांच्यासोबत राजेंद्र चांडक, शारदा चांडक सह यजमान म्हणून बसले होते. दुपारी ३.३० वाजता श्री संत अच्युत महाराजांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचा शुभारंभ सचिन देव महाराजांच्या अमृततुल्य भागवत प्रवचनाने झाला. त्यानंतर लगेच सचिन देव महाराज अयोध्येला जाण्यासाठी निघाले. त्यावेळी श्रीक्षेत्र शेंदुरजना बाजार आणि श्रीक्षेत्र वरुड येथील श्री अच्युत महाराज परिवारातील हजारो भक्त मंडळींनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून भव्य स्वागत केले. रात्री ८ वाजता हभप नारायण महाराज पडोळे यांच्या किर्तनाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. दिवसभराच्या पूर्ण कार्यक्रमाचे संचालन गायत्री परिवारचे प्रमुख गिरिधर देशमुख यांनी व आभार प्रदर्शन श्री संत अच्युत महाराज जन्मभुमी संस्थानचे अध्यक्ष दत्ता शिंदे यांनी केले.

# मतदार यादीचा पुनरिक्षण कार्यक्रम अंतिम मतदार यादी २३ जानेवारीला होणार प्रसिध्द

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** भारत निवडणूक आयोगाने दिनांक १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्याचा दिनांक २२ जानेवारी २०२४ (सोमवार) असा होता. तथापि राज्य शासनाने सोमवार दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामलल्ला प्राण–प्रतिष्ठा दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे २२ जानेवारी ऐवजी मंगळवार दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत, असे उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अज्ञात कुळाच्या सीतेसोबत नाते जोडणारा राम ! जय सियाराम !



प्रभाते मनी राम चिंतीत जावा, ही ओळ वरकरणी सोपी दिसते. रामाच्या चिंतनात प्रत्येक वेळी रामाच्या नव्या पैलूंचे दर्शन होते. रामायण लिहीणाऱ्या वाल्मिकींच्या अथांग प्रतिभेचा तळ जसा हाती लागत नाही तेवढाच रामायणातील महानायकाचा बोध होणे महतप्रयासाचेच. म्हणूनच आपल्याला संतांनी भक्तीचा सरळ सोपा मार्ग दाखवला. केवळ नामजपातून प्राप्त होणारे अंशही आपल्यासाठी उद्धारक ठरतात.रामाचा विश्वामित्रांच्या सानिध्यात प्रवास सुरु आहे. जिज्ञासा चाळवून राम गुरुदेवांना विचारतो आणि विश्वामित्र मिथिलेची कथा सांगू लागतात.मिथिलेचा राजा जनक म्हणून ओळखला जातो. मुळात जनक ही एक उपाधी होती. गादीवर विराजमान असलेल्याला जनक संबोधले जायचे. तत्कालीन जनकाचे नाव होते सीरध्वज. सीरध्वज आणि त्यांची पत्नी सुनयना यांना अपत्य होत नव्हते. सीरध्वज राजा असतानाही तपस्वी वृत्तीचा होता. लोकप्रिय देखील होता. जनकाच्या राज्यकारभारावर प्रजा संतुष्ट होती. एका यज्ञाच्या निमित्त भूमी नांगरत असताना एका पेटीत जनकाला अर्भक प्राप्त झाले. ही मुलगी या दाम्पत्याने स्वीकारली. तिचे सीता हे नामकरण झाले. चुणचुणीत, देखणी, शूर आणि शास्त्रात गोडी असलेली सीता संपूर्ण राज्याची लाडकी राजकन्या झाली. जनका विषयी प्रजेला जेवढा आदर तेवढाच लोभ सीतेवर देखील. जनक व सुनयनाच्या जीवनात सीतेच्या आगमनानंतर आनंदाचे दिवस प्राप्त झाले. राजमहालाचे औदासिन्य लयाला जाऊन एक नवी चेतना प्राप्त झाली. सीतेच्याच पायगुणाने सुनयनेला प्रसवण्याचे भाग्य प्राप्त झाले. गुणवान सीतेसोबत आता जनकाला उर्मिला नामक दुसरी कन्या प्राप्त झाली. जनकाचा भाऊ कुशध्वज याच्या मांडवी आणि श्रुतकीर्ती व जनकाच्या सीता आणि उर्मिला यांच्या खेळण्या बागडण्यात राजमहाल दंग होता. एका अनामिक शांततेच्या जागी आता प्रसन्नतेचा कोलाहल होता !यज्ञभूमी नांगरताना एका पेटीमध्ये मिळालेली मुलगी जनकाने स्वीकारली नाहीच तर पोटच्या पोरीहून अधिक तिच्यावर माया केली. जनकाने तर तिला स्वीकारलेच पण मिथिलेतील प्रजेनेही तिला स्वीकारले. पेटीत सापडलेले हे मुल कोणाचे ? कुठल्या वर्णाचे ? मी हिला स्वीकारले तर समाज काय म्हणेल ? हिचा जन्म कसा झाला ? एवढे गोंडस बाळ का त्यागले असेल ? या बाळाचे गोत्र कोणते ? उच्च – निचतेची अडचण कोणी उभी केली तर ? यापैकी एकही प्रश्न जनकाच्या मनात निर्माण झाला नाही. पण जनकाच्या मनातील करुणा या सर्व प्रश्नांपेक्षा किंवा सामाजिक स्थिती पेक्षा प्रभावी ठरली. माणसाने माणसाशी माणसासम वागणे ही जनकाची वृत्ती आहे. जनकाने सीतेला मुलगी म्हणून स्वीकारताना कोणावर उपकार करीत असल्याची भावना चुकूनही दर्शवली नाही. त्याच्या मनालाही असा भाव शिवला नाही. याच कन्येला जनक आणि सुनयना दोघांच्याही जीवनात सर्वात मोठे व प्रेमाचे स्थान आहे.जनकाने सीतेला अपार प्रेमाने वाढवले. उत्तमातले उत्तम शिक्षण दिले. दोघांनीही उत्तम संस्कारांचे रोपण केले. मात्र, आता सीता विलक्षण रूपवती युवती आहे. तिच्या सौंदर्याला तोड नाही. तिच्या योग्यतेचे वरसंशोधन हा राजा जनकात वास करणाऱ्या पित्याचा चिंतेचा विषय बनला आहे. सीतेच्या गुण आणि रूप संपन्नतेवरून तिच्याशी विवाह करण्यास देशोदेशीचे नरेश तयार होतील यात शंकाच नाही. पण सीतेच्या योग्यतेला भावणारा उत्तम पुरुषच तिला पती म्हणून प्राप्त व्हायला हवा. सीतेला जनक आणि सुनयना माता पिता म्हणून प्राप्त झाले तेव्हा उपस्थित न झालेली गोत्राची किंवा तिच्या मूळ कुळाची अडचण तिच्या विवाहात विघ्न तर आणणार नाही ना !विवंचनेतील जनकाने चित्त स्थिर करून सीतेला कोणाच्याही हाती न सोपवण्याचा निर्धार केला. सीतेचे भवितव्य उजवल व्हावे, तिच्या गुणांचे मोल व्हावे आणि तिला अनुरूप असाच पराक्रमी राजकुमार तिच्या आयुष्यात यावा यासाठी जनकाने स्वयंवराची योजना केली.शिवाने त्रिपुरासराच्या वधासाठी वापरलेला पिनाक नामक धनुष्य जनकाकडे परंपरेने आहे. या धनुष्याला प्रत्यंचा जोडण्याचे तंत्र तेव्हा कोणाच जवळ नाही. एखाद्या महापराक्रमी आणि सदुरूंची कृपा असलेल्या योद्ध्यालाच ही प्रत्यंचा जोडणे शक्य आहे. म्हणून हा कठीण पण जनकाने रचला. कदाचित असा कठीण पण कोणी पूर्ण करू शकला नाही तर अज्ञात कुळामुळे सीता कोणाच्याही पदरी बांधली गेली, असे होणार नाही.रामाने पिनाक शिवधनुष्याला प्रत्यंचा जोडावी आणि सीतेशी विवाह करावा हा प्रस्ताव विश्वामित्रांनी ठेवला. प्रस्ताव सोपा नव्हता. आयुष्यातील सर्वात मोठ्या वळणाचा निर्णय घ्यायचा होता. कदाचित रामासमोर असंख्य प्रश्नांची, शंकांची मालिका उभी झाली असेल. राजमहालातून निघताना विवाहाचा विषयही मनाला शिवला नव्हता. तिकडे राजा दशरथ रामाच्या विवाहाच्या विचारात गर्क होते. दशरथाने कुठली मुलगी सुचवली असती ? सीता ? तशी शक्यता नाही. कारण अयोध्या आणि मिथिला यांच्यात फार काही मैत्री असल्याचे ऐकिवात नव्हते. आई आणि वडिलांच्या अनुमतीशिवाय विवाह करणे कितपत उचित ? विश्वामित्र गुरुदेवांची आज्ञा पाळायची की नम्र नकार द्यायचा ? अज्ञात कुळाच्या सीतेचा आपण स्वीकार नाही करायचा तर कोणी करायचा ? पण प्रण जिंकला म्हणून सीताही आपल्याला मनःपूर्वक स्वीकारेल की केवळ विजेता म्हणून आपल्याला वरमाला घालेल ? सीतेच्या मानसिक स्थितीचे काय ? समोर येणारा प्रत्येक प्रश्न महत्वाचा होता. या प्रत्येक प्रश्नाचे, मनात येणाऱ्या शंकांचे निरसन न झाल्यास विवाहाला सामोरे कसे जायचे ?विश्वामित्र कर्मठ असले तरी त्यांच्या वात्सल्याची देखील रामाला प्रचिती आलेली. रामाच्या मनालाही सीतेच्या कुळ, गोत्र आणि जन्मकथेविषयी साशंकता नाही, याची खात्री विश्वामित्रांना आहे. रामाने आपल्या वर्तणुकीतून ती सिद्ध केली आहे. काही शंकांचे निरसन कदाचित विश्वामित्रांना करावे लागले असावे. भूतलावर वाढलेल्या दैत्य दानवांच्या दुष्प्रभावाला निष्प्रभ करण्यासाठी अयोध्या आणि मिथिला यांच्यात नातेसंबंध प्रस्थापित होईल. आणि हो ! सीतेस रामाशिवाय आणि रामास सीतेशीवाय विश्वात पर्याय असू शकत नाही. विश्वामित्रांची एवढी पावती रामास पुरेशी आहे. रामाच्या मनातल्या सर्व शंका क्षणात दूर झाल्या. तरीही एक खंत आहे. सीतेने देखील आपल्याला मनःपूर्वक स्वीकारावयास हवे. केवळ कठीण पण जिंकला म्हणून तिच्या मनाविरुद्ध विवाहास सामोरे जावे लागू नये. एवढ्यानेच राम चिंतीत होता.विश्वामित्रांच्या शस्त्रविद्येने पारंगत झालेल्या रामाने सहज शिवधनुष्याला प्रत्यंचा जोडण्यासाठी वाकवलेच नाही तर ते कडाडून मोडून पडले. राम आणि सीता हे अद्वैत आकाराला आले. काही दिवसांनी यथासांग अविस्मरणीय विवाह सोहळा पार पडला. अयोध्या आणि मिथिला यांच्यात घप्प नाते प्रस्थापित झाले. लक्ष्मण उर्मिला, भरत मांडवी आणि शत्रुघ्न श्रुतकीर्ती असे चौघांचेही विवाह पार पडले.जनकाने वाढवलेल्या भूमीकन्येच्या गोत्राचा, मुळाचा विचार न करता राम सीतेला अर्धांगिनी करतो. पण त्याचा त्याला आयुष्यात अहंकार नाही. सीतेसही आपण वर म्हणून योग्य आहोत की नाही याचा विचार करण्याचा अधिकार राम देतो. समाज जीवनात अत्युच्च आदर्श प्रस्थापित करणारे सीतेचेही जीवन आहे. जेथे राघव तेथे सीता ! सीतेशिवाय रामाच्या जीवनाला पूर्णत्व नाही. गदिमांनी या नात्याला आकाश आणि धरतीच्या मिलनाची किती समर्पक उपमा दिली आहे. आकाशाशी जडले नाते धरणी मातेचे ! एकाहून अधिक पत्नी करण्याची समाज मान्यता व रूढी असताना राम एक पत्नीत्वाचा पुरस्कर्ता ठरतो. म्हणूनच राम हा शब्द विश्वास, आशा, मंगळाचे जे मंगळ यासाठी पर्यायवाचक शब्द बनतो. राममंदिरात रामललाची प्राणप्रतिष्ठा होत असताना रामाच्या जीवनातील या पैलूंचे आपल्या जीवनात येणे अभिप्रेत आहे.–



**शिवराय कुळकर्णी**
**प्रवक्ता, भाजपा, महाराष्ट्र**
**९८८१७१७८२७**

## हवामानातील बदलामुळे मायग्रेनची समस्या गंभीर होऊ शकते

दि.२१विदर्भ प्रजासत्ताक मायग्रेन ही एक समस्या आहे जी तुमच्या जीवनातील दैनंदिन कामांवर देखील परिणाम करते. हे सौम्य डोकेदुखीसारखे सुरू होते, जे नंतर असह्य वेदनांमध्ये बदलते. सहसा, हे डोक्याच्या एका भागात उद्भवते, परंतु काहीवेळा ते संपूर्ण डोक्यात पसरू शकते, ज्यामुळे साधी दैनंदिन कामे देखील कठीण होऊ शकतात. यामुळे, मळमळ, उलट्या, प्रकाश किंवा आवाजाची संवेदनशीलता यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात, ज्यामुळे ही समस्या अधिक कठीण होते.

हिवाळ्यात मायग्रेन का वाढू शकतो?




मेयो क्लिनिकच्या मते, हवामानातील बदल, जसे की अति थंडी किंवा उष्णता, कोरडी हवा, उच्च आर्द्रता, हवेच्या दाबातील बदल इत्यादींमुळे मायग्रेन होऊ शकतो. त्यामुळे हिवाळ्यात मायग्रेनची समस्या आणखी वाढू शकते. त्यामुळे सध्याच्या काळात, जेव्हाथंडीची लाटजारी असते, तेव्हा मायग्रेन अधिक ट्रिगर करू शकतो.

**मायग्रेनचे ट्रिगर काय असू शकतात?**

जास्त कॉफी किंवा अल्कोहोलचे सेवन ,भावनिक ताण, अधिक तेजस्वी प्रकाश, खूप मोठा आवाज, झोपण्याच्या पद्धतीत बदल, हार्मोनल बदल ,तीव्र शारीरिक हालचाल,दुपारचे जेवण चुकणे. जास्त मीठ खाणे किंवा प्रक्रिया केलेले पदार्थ, औषधांचा अभाव, हवामानात बदल अधिक थकवा– या कारणांमुळे मायग्रेन होऊ शकतो. त्यामुळे तुम्हाला मायग्रेनचा त्रास होत असल्यास, हे ट्रिगर करणारे घटक लक्षात ठेवा. मायग्रेनवर कोणताही इलाज नसला तरी औषधे आणि जीवनशैलीतील बदलांच्या मदतीने त्यावर नियंत्रण मिळवता येते.

**मायग्रेनचे व्यवस्थापन कसे करावे ?**– तुम्हाला मायग्रेनची समस्या असल्यास, तुमच्या लक्षात आले असेल की मायग्रेनचा त्रास सुरू होण्यापूर्वी काही लक्षणे दिसू लागतात. ही लक्षणे दिसू लागताच, सावध व्हा आणि सर्व उत्तेजक घटकांपासून स्वतःला दूर करा आणि शांत ठिकाणी राहा, शक्य असल्यास प्रकाश आणि आवाजापासून दूर असलेल्या खोलीत थोडा वेळ झोपा.

आपल्या आहाराची काळजी घ्या. आपल्या आहारात हंगामी भाज्या, फळे, धान्ये इत्यादींचा समावेश करा आणि अतिरिक्त मीठ, साखर आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांपासून दूर रहा. तसेच शरीरात पाण्याची कमतरता भासू देऊ नका.

जेवण न करता नियमित आणि वेळेवर खा. खाण्यास उशीर करू नका किंवा जेवण वगळू नका.

# शहरातील प्रत्येक मंदिरात आज लागणार साडेपाच फुटी अगरबत्ती

## किरण एजन्सीचा राम प्रतिष्ठापना प्रित्यर्थ चे उपक्रम

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक दर्यापुर** संपूर्ण भारतभर अयोध्या येथील राममूर्तीची प्रतिष्ठापना २२ जानेवारीला विविध मान्यवरांच्या व लाखो भक्तांच्या उपस्थितीत अयोध्या येथे होणार आहे त्यानिमित्ताने संपूर्ण भारतभर विविध संस्थांतर्फे विविध उपक्रम राबवणे सुरू आहे त्यातच छोटासा उपक्रम म्हणजे प्रयत्न दर्यापूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रतिष्ठित नागरिक किरण शांतीलालजी शहा महेश शहा यांच्या किरण एजन्सी दर्यापूर च्या वतीने शहरातील राम मंदिरासह सार्वजनिक मंदिरांमध्ये साडेपाच फूट ते सहा फूट उंचीची असलेली स्पेशल झेड ब्लॅक नावाच्या कंपनीची अगरबत्ती प्रत्येक मंदिराला त्यांनी २२ जानेवारीला लावण्याकरिता पाठवली आहे प्रत्येक मंदिर संचालक सकाळी आपापल्या मंदिरामध्ये ती लावणार असून ती एकसारखी अठरा तास जळणार आहे या आगळे वेगळ्या उपक्रमाबद्दल किरण शहा, महेश शहा यांचे सर्वत्र कौतुक होत आहे एवढेच नाही तर रोहिणी फाउंडेशन चे अध्यक्ष किशोर ठाकूर,प्रतिभा साहित्य संघाचे तालुकाध्यक्ष विनोद पाटील शिंगणे रोहिणी फाउंडेशन दर्यापूरचे सचिव निलेश पारडे ,अमोल कंटाळे, श्री गाडगे महाराज बालगृह दर्यापूरचे संचालक गजानन देशमुख, युवा शेतकरी नेता प्रवीण पाटील कावरे, युवा एकता सामाजिक संघटना अध्यक्ष दत्ता पाटील कुंभारकर, बलराम पाटील काळमेघ आदी सर्वांनी किरण शहा यांचे व्यक्तीच्या भेटून अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.






## लोणार विकास आराखड्यांतील विकासकामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी

# विकास आराखड्यातील कामे विहीत कालमर्यादेत पूर्ण करा

### – विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक- अमरावती,** लोणार विकास आराखड्यां तर्गत असलेली कामे प्रगतीपथावर असून आराखड्यातील उर्वरित कामे नियोजित कालावधीत पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिले. लोणार विकास आराखड्यांतर्गत असलेल्या कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी व विकासकामांच्या प्रगतीचा आढावा डॉ. पाण्डेय यांनी शनिवारी (ता.२० जानेवारी) लोणार येथे घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बुलडाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य वनसंरक्षक जयोती बॅनर्जी, समितीचे सदस्य तथा न्यायालयीन मित्र ड. एस. सान्याल, ड. दिपक ठाकरे, ड. कप्तान, ड. परचुरे, भारतीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक अरुण मलीक, विशेष कार्य अधिकारी सुशील आग्रेकर, वनविभाग, नगरपरिषद, एमएमआरडीएचे अधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.श्रीमती पाण्डेय म्हणाल्या की, बुलडाणा जिल्ह्यातील बेसॉल्ट खडकात उल्कापातामुळे निर्माण झालेले लोणार सरोवर हे जगविख्यात आहे. हे स्थळ जैवविविधतेने सपन्न असून पर्यटनाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. लोणार सरोवराच्या जतन, संवर्धन व विकास तसेच परिसराच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाव्दारे ३६९ कोटी ७८ लक्ष रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील प्रस्तावित कामे पूर्णत्वास जाण्यासाठी समितीव्दारे नियमितपणे आढावा घेण्यात येतो. आराखड्यांतर्गत येणाऱ्या विविध विकासकामांना प्रशासकीय मान्यता व निधीची तरतूद उपब्धत करुन देण्यात आली आहे. त्यानुसार आरखड्यातील विकासकामे गतीने पूर्ण होण्यासाठी कार्यान्वयन यंत्रणांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. विकास आराखड्यांतर्गत येणारी लोणार सरोवर व परिसरातील नागरी सुविधांची कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.





सरोवराचे पाणी व जैवविविधतेसंबधी संशोधन करण्यासाठी संशोधकांना नवीन संधी व दिशा उपलब्ध आहेत. यासाठी शासनाद्वारे वैज्ञानिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली असून त्या अनुषंगाने नवीनतम संशोधनाला गती देण्यात यावी, अशा सूचनाही विभागीय आयुक्तांनी यावेळी केल्या.विकास आराखड्यांतर्गत भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असलेल्या १५ मंदिरांचे जतन, संरक्षण व सुशोभिकरण व दुरुस्तीची कामे टप्प्या टप्प्याने सुरु आहेत. त्या कामांना गती देवून ऐतिहासिक वारसा असलेल्या वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यात यावे, असे निर्देश समिती सदस्यांनी यावेळी दिले. सरोवर परिसरातील 'ईको टुरिझम' चे काम पूर्णत्वास जाण्यासाठी वनविभागाने जबाबदारीपूर्वक प्रयत्न करावे. लोणार सरोवराला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी आवश्यक सुविधांची उभारण्याची कामे गतीने पूर्ण करण्यात यावी तसेच पूर्णत्वास गेलेल्या कामांचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, अशा सूचनाही डॉ. पाण्डेय संबंधित विभागाला दिल्या. विद्यापीठाकडून उभारण्यात येणाऱ्या लोणार विज्ञान केंद्र व संशोधन प्रयोगशाळेच्या ठीकाणी प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामांचा आढावा समितीने घेतला. याप्रसंगी विभागीय आयुक्त व समिती सदस्यांनी सरोवरातील वाढलेल्या पाण्याचे व वेडी बाभूळ, भारतीय पुरातत्त्व विभागाच्या अखत्यारिततील पापरेश्वर मंदिर, गो-मुख, देवी पॉइंट आदी विविध स्थळांना समितीने भेटी देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली.पाहणी दौऱ्यात आणि बैठकीस नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, भारतीय पुरातत्त्व विभाग,पाटबंधारे विभाग, अमरावती विद्यापीठ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, वनविभाग आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## शताब्दी महोत्सवानिमित्य

# न्यू हायस्कूल मेन शाळेच्या माजी विद्यार्थ्यांची एक दिवसीय शाळा उपक्रमाचे आयोजन







**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** अमरावती शहरातील नामांकित असलेली न्यू हायस्कूल मेन शाळेच्या शताब्दी समारोह निमित्त माजी विद्यार्थ्यांसाठी एक दिवसाची शाळा हा सुंदर असा उपक्रम राबविण्यात आला.अमरावती शहरातील सर्वात जुनी शाळा म्हणून या शाळेची ओळख आहे, या शाळेत अमरावती शहरातील खासदार,डॉ.,महाराष्ट्र केसरी असे विविध क्षेत्रातील खेळाडू घडविले आहे. स्वातंत्र्या पूर्वीची इ.स.१९२४ मध्ये न्यू हायस्कूल मेन या शाळेची स्थापना झाली तेंव्हापासून या शाळेने हजारो विध्यार्थी घडविले आहेत या वर्षी शाळेचा शताब्दी महोत्सव या निमित्याने सर्व माजी विद्यार्थ्यांची शाळा पुन्हा एकवेळ भरविण्यात आली या वेळी विभिन्न क्षेत्रातील कार्यरत माजी विद्यार्थी या एक दिवसीय शाळेत उपस्थित होते या एक दिवसीय शाळेमध्ये १९५० ते २०२३ सालापर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते हे विशेष.आज १०० पेक्षा जास्त माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून दिवसीय शाळेत आजी आणि माजी शिक्षक विद्यार्थ्यांची तासिका घेण्यात आली शाळेची सुरुवात सकाळी ११.३० वाजता प्रार्थना व राष्ट्रगीताने झाली त्यानंतर मधल्या सुट्टीत माजी विद्यार्थी घरून आणलेला डब्ब्याचा तसेच शाळेत तयार करण्यात येणाऱ्या खिचडीचा आस्वाद घेतला आपल्या बालमित्रांसोबत सर्व विध्यार्थी एकत्र आल्याने प्रत्येक विध्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आंनद आज दिसत होता एकूण ५ तासिका आज झाले त्यांनतर करोड स्पर्धा हि घेण्यात आल्या इस १९३४ साली यामी शाळेचा विध्यार्थी होता त्यामुळे आंनद होत आहे शाळेत बराच फरक पडला त्यावेळी फडके आणि इनामदार हे दोन शिक्षक होते

सर्व विद्यार्थ्यांनी पांढरा शर्ट आणि पॅन्ट घालून शाळेत आले होते. तसेच अंतिम तासिका खेळाची घेण्यात आली या एक दिवसाच्या शाळेमुळे माजी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा त्यांच्या बालपणीच्या विश्वात जगण्याची संधी मिळाली असून जुन्या काळातील आठवणीना उजाळा मिळाला असल्याचे विध्यार्थ्यानी सांगितले .

मेळाव्याच्या निमित्ताने परत एकदा एकत्र आलेले सर्व माजी विद्यार्थी आठवणीत हरवून गेले होते. 'प्रत्येकजण आपली शाळा कशी आहे, हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता. वर्ग मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होता.यावेळी अनेकांनी हि भरत आणि आठवण आपल्याला प्रेरणा देत राहील अश्या प्रकारे आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी विद्यार्थ्यांमध्ये माजी खासदार अनंत गुढे, महाराष्ट्र केसरी संजय तिरथकर यांच्यासह माजी शिक्षक उमाकांत मालेगांवकर, विवेक काळीकर, श्रीकांत तांबे, मुकूंद डोळे, किशोर देशमुख, गजानन श्रीनाथ, उल्हास बोपोरीकर, मनोज पाठक, पुरुषोत्तम प्रांजले, अनंत निंबोळे, राजू झामरे,दिलीप भवरे, अनंत हरिदास, विवेकांत यांच्यासह वर्तमान मुख्याध्यापिका वर्षा जदबंशी, संस्थेचे सचिव निनाद सोमण, अध्यक्ष डॉ. माया शिराळकर, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कसबेकर, उपाध्यक्ष किशोर नवसाळकर, व्हीडी जोशी सहसचिव प्रदीप पाथ्रीकर हे उपस्थित होते.

---

# एटीएम चोरटे हरियाणा मधून अटक

## गुन्ह्यात वापरलेली चार चाकी ही जप्त



**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** – तिवसा व वरूड येथील एटीएम गॅस कटरने कापून त्यातून ४१.४७ लाखांची रोख लंपास करणाऱ्या घटनेचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. 'टीम एलसीबी'ने गुन्ह्यात वापरलेली चारचाकी व वाहन मालकास हरयाणातून ताब्यात घेतले. २१ जानेवारी रोजी टीम एलसीबी त्या वाहन मालकाला घेऊन येथे पोहोचल्यानंतर एटीएम फोडीच्या दोन्ही घटनांतील आरोपींचे नावे निष्पन्न झाली असून, ती टोळी हरयाणातील असल्याची उकल झाली आहे. मोहम्मद तौफिक मोहम्मद कमरुद्दीन (३२, रा. जमालगड, ता. पुन्हाना, जि. नूह) असे अटक आरोपीचे नाव आहे.

८ जानेवारी रोजीच्या रात्रीदरम्यान सव्वा तासाच्या अंतराने वरूड व तिवसा येथील एटीएम गॅस कटरने तोडून त्यातील रोख रक्कम लांबविली गेली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यागुन्ह्यांचा तपास करीत असताना त्यात आरोपींनी एचआर ९३-ए ४२४८ ही चारचाकी वापरल्याची माहिती त्यांना मिळाली. ते हरयाणातील मो, तौफिक

याच्या नावाने असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हरयाणात पोहोचले. तेथे वाहन मालक मो. तौसिफला ताब्यात घेण्यात आले.

### लसीबीची कारवाई

एलसीबीचे निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वातील सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार, उपनिरीक्षक नितीन चुलपार, संजय शिंदे, नितीन इंगोले, मो. तस्लीम, सागर हटवार यांनी ही कारवाई केली.

### तौसिफला मिळाला एटीएम फोडीचा हिस्सा

मो . तौसिफच्या जबाबानुसार, ७ जानेवारी रोजी त्याचा मित्र मो. जमशेद (ह. मु. खानपूर खेडी, जि. नूह) हा काही साथीदारांसह त्याच्याकडे पोहोचला. एटीएम फोडण्यासाठी त्यांनी त्याला चारचाकीची मागणी केली. ती चारचाकी घेऊन जमशेद व अन्य साथीदारांनी ८ जानेवारी रोजी रात्री वरूड व तिवसा हद्दीतील एटीएम फोडले. रक्कम व वाहन घेऊन ते १० जानेवारी रोजी तौफिककडे पोहोचले. मो. तौफिक याला हिस्सा म्हणून रोख १.७०–

---

# अमरावती तालुका शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २३ व २४ जानेवारीला !

## गर्ल्स हायस्कूल कॅम्प येथे आयोजन सुमारे ६०० खेळाडू व शिक्षक सहभागी होणार

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** अमरावती पंचायत समिती अंतर्गत तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे २३ व २४ जानेवारीला शासकीय माध्यमिक कन्या शाळा ( गर्ल्स हायस्कूल) कॅम्प अमरावती येथे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सांघिक व वैयक्तिक खेळासह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे ६०० खेळाडू व शिक्षक सहभागी होणार असून त्यांची भोजनाचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे. क्रीडा महोत्सवाचे उदघाटन तिवसा मतदार संघाच्या आमदार यशोमतीताई ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी बडनेरा मतदार




संघाचे आमदार रविभाऊ राणा आहेत. प्रमुख अतिथी शिक्षणाधिकारी प्रफ्फुल कचवे, गटविकास अधिकारी डॉ. प्रफ्फुल भोरखडे यांच्यासह शिक्षणाधिकारी योजना सैय्यद राजीक सैय्यद गफ्फार, उपशिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया देशमुख, गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे, शिक्षण विस्तार अधिकारी संदीप बोडखे यांची राहणार आहे. दोन दिवसीय महोत्सवात सांघिक व वैयक्तिक खेळासह सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून अंजनगाव बारी, वलगाव, नांदगाव पेठ या बिटमधील विजयी संघातील सुमारे ६०० विद्यार्थी व खेळ शिक्षक सहभागी होणार आहे. त्यांची जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापन, स्वागत, निर्णय, मैदान, भोजन, कार्यालयीन, स्टेज, सांस्कृतिक, बक्षिस वितरण व प्रसिद्धी समिती गठीत करण्यात आली असून त्यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. बक्षिस वितरण २४ जानेवारीला दुपारी ३ वाजता गटविकास अधिकारी डॉ. प्रफ्फुल भोरखडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर, श्रीमती गजाला नाजली ई. खान, विस्तार अधिकारी अश्विन मानकर, संगीता सोनोने, अजित पाटील यांची उपस्थिती राहणार आहे. क्रीडा महोत्सवात सर्व खेळाडू व शिक्षकांनी सहभागी होण्याचे आवाहन शिक्षण विस्तार अधिकारी अनिल डाखोळे, केंद्रप्रमुख सुरेंद्र मेटे, स्मृती बाबरेकर, भास्कर दाभाडे, विलास बाबरे, नंदकुमार झाकर्डे, सुधीर भोळे, प्रशांत मुंद्रे, इकबाल पटेल, बाळकृष्ण आंधळे यांनी केले आहे. अशी माहिती प्रसिद्धी समितीचे अध्यक्ष विनायक लकडे यांनी दिली आहे.

# 'विकसीत भारत संकल्प'यात्रेला जिल्ह्यात अभुतपूर्व प्रतिसाद

## खा.राकेश सिन्हांच्या साधेपणाचे कौतूक, कार्यकर्त्यांचे घरी घेतले भोजन

### खा.अनिल बोंडेंच्या पुढाकारातून शिस्तबद्ध नियोजन



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** समाजातील शेवटच्या घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून निघालेल्या 'विकासीत भारत संकल्प यात्रेला' जिल्ह्यात उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्याकरिता बिहार येथील राज्यसभा खासदार राकेश सिन्हा हे स्वता: जिल्ह्यात आले होते.

कार्यकर्त्यांच्या घरी जावून भोजण करण्यापासून ते केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती त्यांनी नागरिकांना दिली. खासदार तथा भाजपा जिल्ह्याध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध नियोजनात हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे.

बिहार येथील राज्यसभा खासदार राकेश सिन्हा हे तीन दिवसीय विकासीत भारत संकल्प यात्रेच्या निमित्त्याने अमरावती जिल्ह्यात आले होते. दरम्यान त्यांनी दर्यापूर, अचलपूर, मेळघाट यासह अन्य विधानसभा क्षेत्रातील विविध गावांना भेटी दिल्या. गाडगेबाबांचे जन्मगाव शेंडगाव येथे त्यांनी बाबांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेतले. त्याठिकाणी नागरिकांशी संवाद साधला. प्रधानमंत्री जनआरोग्य, आयुष्यमान भारत योजना, आवास योजना, नमो आवास, ड्रोन प्रात्यक्षिक, रेशन कार्ड वितरण यासह विविध योजनांची माहिती देत त्यांच्याद्वारे प्रत्यक्ष नागरिकांना योजनेचा लाभ देण्यात आला. लाखनवाडी, ब्राम्हणवाडा थडी, माधान यासह विविध गावांना त्यांनी भेटी दिल्या. तर मेळघाट विधानसभा क्षेत्रातील डोमा या गावासह अन्य ठिकाणी खासदार राकेश सिन्हा यांनी आदिवासी नागरिकांसोबत संवाद साधला. त्यांच्याघरी जावून भोजनही केले.

यावेळी डॉ.अनिल बोंडे, सरचिटणीस नितीन गुडधे-पाटील, विवेक गुल्हाणे, माजी आमदार रमेश बुंदिले, प्रभुदास भिलावेकर, रेखा मावस्कर, विलास कविटकर, बाबाराव बरवट, मदन बायस्कार, गोपाल चंदन,मेघा भारती, निता बोचरे, नकुल सोनटक्के यांच्यासह भाजपा पदाधिकारी यावेळी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

**शेंडगाव येथे प्रधानमंत्र्यांचा नागरिकांशी संवाद**

गाडगेबाबांची जन्मगाव शेंडगाव येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विकसीत भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून दुरदृश्य प्रणालीद्वारे नागरिकांशी संवाद साधला. त्याला अभुतपूर्व प्रतिसाद मिळाला. नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाव यावेळी दिसले. गोरगरिब नागरिक, शेतकरी, शेतमजूर, महिला, युवा यांच्याकरिता केंद्र सरकाराने कार्यान्वित केलेल्या योजनांची माहिती त्यांनी दिली.

**विकासाचा झंझावात डोळे दिपविणारा– डॉ.अनिल बोंडे**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशभरात विकासाचा झंझावात सुरू आहे. तर राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा न भुतो न भविष्यती विकास होत आहे. देशाची व राज्याची होणारी प्रगती नागरिकांचा सन्मान वाढविणारी आहे. विकासीत भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून नागरिकांना थेट घरपोच शासकीय योजनांचा लाभ दिला जात असल्याने नागरिक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानत असल्याची माहिती यावेळी खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी दिली.

# कापसाचे भाव पडल्याने जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी संकटात !

## उदरनिर्वाह कसा करायचा ; कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पडला प्रश्न !

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक मोर्शी** विदर्भातली नगदी पीक म्हणून आजही कापसाचा उल्लेख केला जातो. मात्र यंदा कापसाने शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. खरीप हंगामात यावर्षी कापूस आणि सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याने शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची अपेक्षा आहे. शिवाय लागवड खर्चाइतकेच पीक हातात येत असल्याने उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्न कापूस, सोयाबीन, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पडला असतांना कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा लाखों क्विंटल कापूस खाजगी व्यापारी पडक्या भावात अक्षरशः लुटून नेत असून किमान आधारभूत किंमत सुद्धा आज मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांत कमालीचे नैराश्य पसरले असून शेतकऱ्यांचे बेहाल थांबविण्यासाठी सी.सी.आय.ची कापूस खरेदी केंद्रे तातडीने सुरू करून शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रती क्विंटल ५ हजार रुपये अनुदान कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष रुपेश वाळके यांनी शासनाकडे केली आहे.



दरवर्षी महागाई दरवर्षी ५ ते ७ टक्क्यांनी वाढत आहेत. तर उत्पादनातही मोठी घट होत आहे. यातून शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही. त्यामुळे कापसाचा हमीभाव १२ हजार रुपये करून शासनाने खरेदी केंद्र सर्वत्र सुरू करावे -- **रुपेश वाळके**



कापसाचे पीक हे मुख्य व रोख उत्पन्न देणारे मानले जाते. त्यामुळे आजही अमरावती जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड होते. परंतु गेल्या काही वर्षांपासून या पिकाला दुष्काळाचे, विविध रोगांचे, महागाईचे, कमी भावाचे ग्रहण लागले आहे. त्यामुळे कापसाची शेती आता शेतकऱ्यांसाठी कर्दनकाळच ठरत आहे. यावर्षी जिल्ह्यात अनेक ठिकाणी शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाने मदत जाहीर केली. मात्र, अनेकांपर्यंत ही मदत पोहोचलीच नाही. शेतकऱ्यांनी यावर्षी एक रुपयात प्रधानमंत्री पीक विमा काढला. विमा कंपनीकडून मदत मिळेल, या अपेक्षेने असणाऱ्या शेतकऱ्यांचा विमा कंपनीकडून अक्षरशः भ्रमनिरास झाला. कापूस आणि सोयाबीनचे भाव कमालीचे घसरत आहेत. विदर्भात हमखास येणारे पीक म्हणजे पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले आहे. कापसाची गेल्या काही वर्षांपासून भाववाढ होत नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. 'खर्च अधिक आणि भाव कमी' अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला असून, याला सरकारचे उदासीन धोरण जबाबदार ठरत आहे.सरकारच्या चुकीच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. सरकार शेतकऱ्यांप्रती गंभीर दिसून येत आहे. हमीभाव फक्त नावालाच आहे. उत्पादन खर्च वाढत असताना हमीभावात फक्त दीडशे ते दोनशे रुपयांची वाढ करते.

# महापालिका कर्मचारी सहकारी प्रत्यय संस्थेत प्रथमच परिवर्तन

## प्रस्थापित ह. मा. काळे पॅनेलला धक्का

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** अमरावती महानगरपालिका कर्मचारी सहकारी प्रत्यय संस्थेच्या निवडणुकीत प्रस्थापितांना जोरदार धक्का बसला आहे. प्रस्थापित ह. मा. काळे पॅनेलला धक्का देत नव्यानेच रिंगणात आलेल्या परिवर्तन पॅनलने १३ पैकी ९ जागा जिंकत संस्थेवर वर्चस्व प्राप्त केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थान या संस्थेत पध्वर्तन झाल्याचे बोलल्या जात आहे.१३ संचालक असलेल्या मनपा कर्मचारी सहकारी प्रत्यय संस्थेची निवडणूक रविवारी (ता.२१) नेहरू मैदान येयोल शाळेत सकाळी आठ ते चार वाजेदरम्यान घेण्यात आली. ४०४ मतदारांपैकी ३८० मतदारांनी या निवडणुकीत सहभाग घेत मतदानाचाहक्क बजावला. यात ३३ मते अवैध ठरलो. मतदानानंतर लगेच मतमोजणी घेण्यात आली. सर्वसाधारण गटातून आठ, महिला राखीव मतदारसंघातून दोन तर इतर मागास वर्ग, अनुसूचित जाती व जमाती तसेच भटक्या विमुक्त जाती गटातून प्रत्येकी एक संचालक निवडून द्यायचा होता.ह. मा. काळे विरुद्ध परिवर्तन पॅनल या लढतीत महिला राखीव गटातील दोनपैकी प्रत्येकी एक जागा परिवर्तनव ह. मा. काळे पॅनलला मिळाल्यात. परिवर्तनच्या सुनीता गुर्जर तर ह. मा. काळे पॅनलच्या ज्योती पारडसिंग या विजयी झाल्यात. तर अनुसूचित जाती- जमाती गटातून परिवर्तनचे चेतन मेश्राम तर भटक्या व विमुक्त जाती गटातून उदय चव्हाण विजयी झाले. राहुल पुरो यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पार पाडले.

**विजयी उमेदवार**

परिवर्तन पॅनेल जयंत काळमेघ, पंकज आकोडे, श्रीकांत गिरी, लक्ष्मण पावडे, भूषण पुसतकर, कुणाल बांबल, सुनीता गुर्जर, चेतन मेश्राम, उदय चव्हाणह. मा. काळे पॅनल: संजय दारव्हेकर, धनंजय शिंदे, ज्योतो पारडसिगे व आकाश तीरचकर



# मंदिर सरकारीकरण विरोधासह ७ ठराव पारित

## महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशन उत्साहात

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती–** महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशनात हिंदू मंदिरांचे व्यवस्थापन भक्तांच्या स्वाधीन व्हावे, मंदिरांच्या संपत्तीचा वापर विकास कामांवर होऊ नये, सरकारने मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी, हिंदूंच्या धार्मिक स्थळावरील विधर्मियांचे अतिक्रमण तत्काळ काढावे, धार्मिक स्थळ परिसर मद्य, मांस मुक्त करावे, २२ जानेवारी रोजी प्रत्येक मंदिरात धर्मध्वज उभारून दिवाळी साजरी करावी, आता मंदिरांनीच समाजाचे नेतृत्व करावे, असे प्रमुख ७ ठराव एकमताने पारित करण्यात आले.



महाराष्ट्र मंदिर महासंघ, श्री देवस्थान सेवा समिती विदर्भ, श्री पिंगळा देवी संस्थान, श्री नागेश्वर महादेव संस्थान, श्री वेंकटेश बालाजी मंदिर ट्रस्ट आणि हिंदू जनजागृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महेश भवन येथे शनिवारी हे अधिवशेन घेण्यात आले. ५५० हुन अधिक मंदिर प्रतिनिधींच्या उपस्थितीत ते उत्साहात पार पडले. शक्ती महाराज, सनातन संस्थेचे अशोक पात्रीकर, मंदिर महासंघाचे समन्वयक सुनील घनवट, यक्षदेव बाबा शास्त्री, सुरेश कौदरे, ॲड. आर. बी. अटल यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून अधिवेशनाची सुरवात झाली.

मंदीर सरकार मुक्त होऊन भक्तांच्या ताब्यात येईपर्यंत आपला हा लढा शेवटपर्यंत चालू राहणार आहे. मंदिरामध्ये ड्रेस कोड असावा की नसावा हे ठरवण्याचा अधिकार मंदिर विश्वस्तांना आहे, असे सुनील घनवट यांनी स्पष्ट केले. मंदिरांमधून मिळणारे धर्मशिक्षण बंद झाल्यामुळे आज हिंदूंची अवस्था बिकट झाली असल्याचे स्वाती खाडे यांनी सांगितले. विश्वास्तांनो आपले दायित्व प्रामाणिकपणे पार पाडा देव काहीही कमी पडू देणार नाही, असे डीगंबर महाले म्हणाले. सरकारीकरणामुळे हिंदूंची मंदिर ही



भ्रष्टाचाराची कुरणं झाली आहेत, असा आरोप श्रीकांत पिसोळकर यांनी केली. मंदिरांच्या कुळ कायद्यात अडकलेल्या जमिनी परत मिळवून देण्यात यश आल्याचे सांगून ॲड. अनुप जयस्वाल यांनी 'प्रशासन आणि मंदिरांच्या विकासातील अडचणी' या विषयावर मार्गदर्शन केले. धर्माच्या प्रचाराची केंद्रे बनवताना त्यांचे कार्य समाजापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक असल्याचे जेष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांनी सांगितले. 'मंदिरातील मूर्ती आणि मंदिराची वास्तू' याविषयी वसंत सोनपराते यांनी मार्गदर्शन केले. अशोक पावडे, कैलाश पनपालिया, आशीष मारूडकर व विनीत पाखोडे आदी मान्यवर उपस्थित होते. समारोपीय भाषण व आभार प्रदर्शन निलेश टवलारे यांनी केले.

# श्रीराम पतंग पोहचली आकाशात महोत्सवाला चांगला प्रतिसाद

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, –** श्रीरामलला प्राणप्रतिष्ठेच्या पुर्वसंध्येला भाजपा नेते किरण पातुरकर यांनी श्रीराम भव्य पतंग महोत्सव रविवारी सायन्सोकर मैदानावर आयोजित केला होता. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. श्रीरामचे तैलचित्र असलेली दहा फुटाची पतंग तयार करून ती उडविण्यात आली. छोट्या मुलांना भगव्या रंगाच्या पतंगचे वितरणही करण्यात आले.या महोत्सवाचा शुभारंभ शक्ती महाराज, खा. अनिल बोंडे, जयंत डेहनकर, रवींद्र खांडेकर, शिवराय कुळकर्णी, किरणताई महल्ले, रविराज देशमुख, नितीन गुडधे, ॲड. प्रशांत देशपांडे, लता देशमुख, राधा कुरील, सुरेखा लुंगारे, गजानन देशमुख, दिपक पोहेकर, मंगेश खोंडे, राजेश आखेगावकर यांच्यासह अन्य नेत्यांच्या व पदाधिकार्यांच्या उपस्थितीत झाला.



# अंबानगरीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती महोत्सवाचे आयोजन

### शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे




**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती** शिवसेनाप्रमुख हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार असून त्यानिमित्त आयोजित जयंती महोत्सवात अमरावती जिल्हा शिवसेना शाखेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेअशी माहिती शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.या महोत्सवामध्ये ,भव्य आरोग्य तपासणी व निदान शिबिर ,विविध स्पर्धा तसेच विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळा,रोजगार मेळावा अशा विविध कार्यक्रमांची भरमार राहणार आहे.

**२५ जानेवारी रोजी विजय ग्रंथ पारायण सोहळा**

२५ जानेवारी रोजी विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्याने जयंती महोत्सवाचा प्रारंभ होणार असून साईनगर, बेनाम चौक स्थित प्रांगणात हा भव्य दिव्य पारायण सोहळा होणार आहे. २५ जानेवारी रोजी रोजी सकाळी सात वाजता सामूहिक पारायण वाचन सोहळ्यात सुरुवात होऊन ते दुपारी तीन वाजेपर्यंत चालणार आहे .श्री गुरुपुष्याच्या योगावर होणाऱ्या सोहळ्यात पुणे येथील डॉक्टर गजानन खासनीस हे व्यासपीठावरून पारायण वाचन करणार आहे.दुपारी चार वाजता महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होईल .सदर विजय ग्रंथ सामूहिक पारायण सोहळ्यात हजारो अमरावतीकर गजानन भक्त सहभागी होऊन पारायण वाचन करणार आहे. तरी भाविक भक्तांनी सामूहिक पारायण सोहळ्यात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी यावेळी केले .

**२७ जानेवारी रोजी भव्य रोग निदान व उपचार शिबिर.**

या महोत्सवाचा एक भाग म्हणून शनिवार दिनांक २७ जानेवारी रोजी सकाळी ९ ते २ या वेळात साईनगर बेनाम चौक स्थित भक्ति मंदिर नजीकच्या प्रांगणात सर्व रोगनिदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे . दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टर आपली सेवा देणार असून नेत्ररोग ,सर्जरी, स्त्रीरोग ,बालरोग, कान ,नाक ,घसा अस्थि रोग ,त्वचारोग ,श्वसन विकार अशा विविध आजाराचे निदान करून उपचार करण्यात येणार आहे. शिबिरामध्ये तपासणी करून उपचारासाठी निवडलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात मोफत उपचार करण्यात येणार आहे .सोबतच एक्स-रे ,रक्त ,लघवी, सोनोग्राफी आदी चाचण्या मोफत करण्यात येऊन सिटीस्कॅन ,एमआरआय आदी विशिष्ट चाचण्या ५०% सवलतीच्या दरात केल्या जाणार आहे .भरती रुग्णांना खाट शुल्क व जेवण मोफत असून काही रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना तसेच अन्य योजनांचा लाभ दिला जाणार असल्याची माहिती शिबिराचे आयोजक शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी यावेळी दिली.

**पाहिजेत**

**विदर्भ प्रजासत्ताक**
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क- prajasattaknews24gmail.com

# संत काशिनाथ महाराजांची भूमी अध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणारे केंद्र : आ.यशोमती ठाकूर

## राममंदिर,संत काशिनाथ देवस्थान, संत काशीनाथ धाम येथे घेतले दर्शन





**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ ला संतपरंपरेचा वारसा आहे,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सुद्धा पदस्पर्श या गावाला लाभले आहेत.संत काशीनाथ महाराज यांचे वास्तव्य याठिकाणी लाभल्याने ही भूमी अध्यात्मिक ऊर्जा निर्माण करणारे केंद्र ठरत असल्याचे प्रतिपादन आ. यशोमती ठाकूर यांनी संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्य काशिनाथ धाम येथील भागवत कथा कार्यक्रमात केले.तरुण, वृद्ध, महिला भगिनी शिवाय बालगोपाळ या धार्मिक महोत्सवात एकत्र येत असल्याने आपल्या संस्कृतीचे एकप्रकारे आपण जतन करत आहोत. त्यामुळे ही ऊर्जा घेऊन संतांचे विचार आणि संत परंपरा जोपासण्याची जबाबदारी आपली असून प्रत्येकाचे कर्तव्य देखील आहे असेही त्या यावेळी बोलल्या. संत काशिनाथ महाराज यांच्या १८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य १५ जानेवारी पासून काशिनाथ धाम येथे भागवत सप्ताह सुरू आहे.रविवारी आ. यशोमती ठाकूर यांनी नांदगाव पेठ येथील राममंदिर, संत काशीनाथ महाराज समाधीस्थळ तसेच काशिनाथ धाम येथील भागवत सप्ताहाला भेट देऊन दर्शन घेतले. येथील ऐतिहासिक असलेल्या राममंदिरात श्रीरामाचे दर्शन घेऊन याठिकाणी आ. यशोमती ठाकूर यांनी महाआरती केली.त्यांनतर काशिनाथ धाम येथे सुरू असलेल्या भागवत सप्ताहाला भेट देऊन त्याठिकाणी व्यासपूजा व महाआरती केली.भागवताचार्य हभप श्री. केशवदादा उखळीकर महाराज यांचेही आशीर्वाद आ. ठाकूर यांनी घेतले. त्यांनतर भाविकांशी देखील त्यांनी संवाद साधला. संत काशिनाथ बाबा संस्थांनच्या वतीने यावेळी यशोमती ठाकूर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी कृ.उ.बा.स. सभापती हरीश मोरे, पं.स.अमरावतीचे माजी उपसभापती बाळासाहेब देशमुख, राजेश बोडखे,सरपंच कविता डांगे,प्रशांत काळबांडे, ऍड अमित गावंडे, विनोद डांगे, शशी बैस, विभाताई देशमुख, शिल्पाताई महल्ले,सुनंदा केचे, सतीश गोटे, वीरेंद्रसिह जाधव, चेतन जवंजाळ, मुकुंद पांढरीकर मंगेश आवारे, ज्ञानेश्वर बारस्कर,सुमित कांबळे, भाऊराव कापडे अनिल कापडे, विजय महल्ले ,दिलीप सोनोने ,पंकज देशमुख ,नंदू कुकडे, बंडू भाऊ पोहकार, दिलीप केणे, प्रवीण मनोहर,अल्केश काळबांडे, चंद्रकांत राऊत, राजेश कोठे, दिनेश धर्मे, सतीश धर्मे,मनीष बोडखे, अविनाश यावले, दिनेश पोकळे, मयूर सदावर्ते ,राजू आमझरे यांचेसह असंख्य कार्यकर्ते व भाविकभक्त उपस्थित होते.

### भंपकबाजी पेक्षा कार्याला महत्व द्या!

ही जागा क्रीडा संकुलसाठी राखीव असून येथील संरक्षक भिंतीसाठी निधी मंजूर झालेला आहे त्यामुळे तो निधी परत न जाऊ देता संरक्षक भिंत बांधून घ्या, भक्तांची इच्छा असेल तर याठिकाणी काशिनाथ धाम बनणारच यात तिळमात्र शंका नाही.ही जागा काशिनाथ धाम ला मिळण्यासाठी योग्य कागदपत्रांचा पाठपुरावा करावा लागेल, आणि त्यासाठी माझी सर्व काशिनाथ भक्तांना साथ असेल त्यामुळे या धार्मिक व्यासपिठावरून भंपकबाजी करण्यापेक्षा कार्याला महत्व द्या असा टोलाही आ. यशोमती ठाकूर यांनी लगावला.

### प्रेम,करुणा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री राम

२२ जानेवारीला अयोध्या येथे होणाऱ्या श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आ. यशोमती ठाकूर यांनी रविवारी नांदगाव पेठ येथील पुरातन श्रीरामचंद्र मठ येथे जाऊन श्री रामाचे दर्शन घेत महाआरती केली.राम प्रत्येकाच्या मनात विराजमान आहेत, प्रेम, करूणा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे श्री राम आहेत.प्रत्येकाने त्यांचे आदर्श घेऊन मार्गक्रमण करावे असेही त्या यावेळी बोलल्या.

# हिंगासपुरेनगरात श्रीराम मूर्तीचे पूजन



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुलोम संस्थेच्या वस्तीमित्रांकरिता पाठविलेल्या कोदंडधारी श्रीराममूर्तीचे पूजन मोठ्या उत्साहात वस्तीमित्र मनीष जाधव यांच्या वतीने हिंगासपुरेनगर येथे पार पडले.

सर्व सामाजिक क्षेत्रातील नेतृत्वाचा यथोचित सन्मान देवेंद्र फडणवीस यांनी श्रीराम मूर्ती पाठवून केला. हिंगासपुरेनगर वस्तीचे वस्तीमित्र मनीष जाधव यांनी शोभायात्रा काढून श्रीराम मूर्तीचे स्वागत केले. यावेळी वस्तीतील वातावरण राममय झाले होते. त्यानंतर वस्तीमित्र मनीष जाधव यांचे घरी श्रीराम मूर्ती पूजन व श्रीराम मूर्ती प्रदान सोहळा पार पडला. यावेळी स्वामी तायडे वाने मारुती स्तोत्र तर श्लोक व्यवहारे याने रामरक्षा स्तोत्र म्हटले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णाजी डाके हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीकांत काळे, ॲड. डांगे, नितीन तायडे, अनुलोम उपविभागजनसेवक अक्षय डोईजड, अनुलोम भागजनसेवक प्रशांत सिसोदिया, वस्तीमित्र मनीष जाधव हे उपस्थित होते. त्यानंतर प्रभू श्रीराम यांची आरती करून प्रसाद वाटप करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वस्तीमित्र मनीष जाधव यांना कोदंडधारी श्रीराममूर्ती प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व देवेंद्र फडणवीसयांच्या पत्राचे वाचन अनुलोम भागजनसेवक प्रशांत सिसोदिया यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रीती जाधव यांनी केले.

कार्यक्रमाला वस्तीतील नितीन मांडवे, नितीन सावळे, काकपुरे, युगांधर व्यवहारे, गजानन रुद्रकार, चवरे, मोहन ठाकरे, राहुल इंगळे, पूजा तायडे, किरण डवले, श्वेता व्यवहारे, स्वाती वेडले, कौसल्या जाधव, माधुरी गायकवाड, काकपुरे, लोखंडे, रुद्रकार, डाफ, डेहणकर उपस्थित होते.

# अयोध्या करिता रेल्वे गाडयांचे आरक्षण हाऊसफुल

## रामलल्लाच्या दर्शनासाठी अतिरिक्त गाडयांची मागणी




**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक नागपूर**

अयोध्येतील श्रीरामाच्या दर्शनासाठी जाणार्या रामभक्त प्रवाशांची संख्या सतत वाढत असल्याने उत्तर प्रदेशातील सर्वच मार्गावरील रेल्वे गाडयांचे आरक्षण हाऊसफुल झाले आहे. रामलल्लाच्या दर्शनासाठी प्रत्येक राज्यातून अतिरिक्त रेल्वेगाडयांची मागणी केल्या जात आहे. दक्षिण मध्य रेल्वेने वेगवेगळ्या शहरातून ९ विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. यात प्रामुख्याने ७ विशेष गाड्या आंध्र प्रदेश आणि तेलंगणा येथून तर २ विशेष गाड्या मराठवाड्यातील जालना आणि नांदेड धावणार आहेत. मात्र यात नागपूरच्या प्रवाशांसाठी आरक्षण अत्यल्प ठेवण्यात आले आहे. मध्यवर्ती नागपूर स्थानकावर अयोध्या विशेष गाड्या सोडण्याची मागणी प्रवासी संघटनेकडून केली आहे.

**एक दिवसाआड रेल्वेची व्यवस्था**


०७२२२ सिकंदराबाद-अयोध्या धाम-सिकंदराबाद ही आस्था विशेष गाड्या २९ जानेवारीपासून दर एक दिवसाआड २९ फेब्रुवारीपर्यंत नागपूर मार्गे धावणार आहे. जवळपास एक महिनाभरात ही विशेष रेल्वे अयोध्या धामच्या १६ फेर्या पूर्ण करणार आहे. आंध्र - तेलंगणातील सिकंदराबाद, काझीपेठ, बल्लारशहा, चंद्रपूर,सेवाग्राम, नागपूर, इटारसी, भोपाळ, झांशी, कानपूर मार्गे अयोध्या धावणार आहे.

**केवळ ४ रेल्वे गाड्यांचा फायदा**

याशिवाय ७२२३ काझीपेठ-अयोध्या धाम-काझीपेठ ही विशेष रेल्वे ३० जानेवारीपासून २८ फेब्रुवारीपर्यंत दर एक दिवसाआड आणि परतीची गाडी २ फेब्रुवारीपासून २ मार्चपर्यंत प्रत्येकी १५-१५ अशा एकूण ३० फेर्या राहील. ७६४९ जालना-अयोध्या धाम- जालना ही विशेष रेल्वेगाडी ४ फेब्रुवारीला जाईल आणि ७ फेब्रुवारीला अयोध्या येथून निघेल. यात प्रामुख्याने ९ विशेष रेल्वेगाडी पैकी ४ रेल्वे गाड्यांचा फायदा नागपूरातील रामभक्तांना होणार आहे. सिकंदराबाद आणि काझीपेठ येथून या विशेष रेल्वेगाड्या बल्लारशाह, चंद्रपूर, सेवाग्राम वर्धा आणि नागपूर मार्गे धावणार आहेत.

# २३ आणि २४ जानेवारीला विदर्भात काही ठिकाणी तुरळक पावसाचा अंदाज

## विदर्भात पुन्हा अवकाळीचे ढग



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. बहुतांश ठिकाणी थंडीमुळे हुडहुडी भरत असल्याचे चित्र आहे. विदर्भात येत्या काही दिवसांत थंडीचा जोर ओसरणार असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असतानाच विदर्भातील काही भागांत रात्रीच्या सुमारास झालेल्या तुरळक पावसामुळे हवेत गारठा वाढला आहे.

गेल्या काही दिवसांपासून नागपूरसह विदर्भातील बहुतांश भागात ढग दाटून येत आहेत. २२ जानेवारीनंतर पूर्व विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये हलक्या सरी कोसळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाच्या वतीने वर्तविण्यात आला होता. मात्र, त्यापूर्वीच तुरळक पावसाने हजेरी लावल्याने हवेत गारठा वाढला आहे. बांगलादेशावर चक्रीवादळाचे क्षेत्र ३.१ किमीपर्यंत पसरले आहे. त्याचप्रमाणे दक्षिणेकडील भागांत कर्नाटक ते पूर्व विदर्भापर्यंत कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले. त्याचा परिणाम विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये देखील जाणवणार असल्याने पूर्व विदर्भात २२ जानेवारीनंतर पुन्हा ढग दाटून येण्याची शक्यता आहे. शिवाय मध्य महाराष्ट्रात चक्रीय स्थिती तयार झाली आहे. या प्रभावाने येत्या २२, २३ आणि २४ जानेवारीला विदर्भात काही ठिकाणी तुरळक पावसाचा अंदाज आहे. येत्या २२ जानेवारीला विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूरला पावसाच्या हलक्या सरी कोसळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. २३ जानेवारीला गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया तसेच २४ जानेवारीला गडचिरोली, गोंदिया आणि यवतमाळमध्ये अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# उत्कृष्ट अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कर्डिले व त्यांच्या अर्धांगिनीची निवड, मतदार नोंदणी अभियान



**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक वर्धा**

राज्यात २०२३-२४ या कालावधीत निवडणूक विषयाच्या अनुषंगाने उल्लेखनीय व नावीन्यपूर्ण कामगिरीची नोंद राज्य शासनाने घेतली आहे. यात सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या अधिकाऱ्यांची विभागनिहाय निवड राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात पुरस्कार व सत्कारासाठी करण्यात आली आहे. नागपूर विभागातून वर्ध्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांची तसेच उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी म्हणून याच विभागातून त्यांच्या पत्नी प्रियंका कर्डीले यांची निवड झाली आहे. अमरावती विभागातून अकोलाचे जिल्हाधिकारी अजित कुंभार, पुणे विभागातून साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, नाशिक विभागात नंदुरबारच्या जिल्हाधिकारी मनिषा खत्री, छत्रपती संभाजीनगर विभागात धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बसे,तर कोकण विभागात सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी किशोर तावडे यांची निवड करण्यात आली आहे.

उत्कृष्ट मतदार नोंदणी अधिकारी म्हणून अमरावती विभागात अकोला येथील अनिता भालेराव, पुणे विभागात सातारा येथील अतुल नेत्रे, कोकण विभागात ठाणे येथील अमित सानप, नाशिक विभागात नाशिकचे विशाल नरवडे,छत्रपती संभाजीनगर विभागात लातूरचे सुशांत शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. मतदारसंघनिहाय प्रियंका कर्डीले - देवळी, अतुल नेत्रे - कराड दक्षिण, अमित सानप - भिवंडी पूर्व, विशाल नरवडे - कळवण, अमिता भालेराव - अकोला पश्चिम, सुशांत शिंदे - उदगीर यांनी मतदार नोंदणी अधिकारी म्हणून या विधानसभा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले.

# प्रहारचे नि:शुल्क महाआरोग्य शिबिर संपन्न

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक शिरखेड**

नेरपिंगळाईत नि:शुल्क आरोग्य रोगनिदान शिबिरचा दोन हजारांच्यावर रुग्णांनी घेतला लाभ. संजय देशमुख प्रहार जनशक्ती पक्ष तिवसा विधानसभा मतदार संघ व जीवन आधार बहुद्देशीय सामाजिक संस्था नागपूर तसेच शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने नेरपिंगळाई येथे रविवार २१ जानेवारी आयोजित अतिविषेश उपचार सुविधांसह नि:शुल्क महाआरोग्य रोगनिदान, शस्त्रक्रिया, उपचार व औषध वाटप शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या महाआरोग्य रोगनिदान शिबिराचा दोन हजारापेक्षा अधिक रुग्णांनी लाभ घेतला. नेर.पिं येथील ज्वालागीर महाराज सांस्कृतिक भवन आयोजित या मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचा मोर्शी तालुक्यातील दोन हजाराहून अधिक रुग्णांनी लाभ घेतला आहे. अल्पवेळात मोर्शी तालुक्यातील गावागावात प्रहार कार्यकर्त्यांनी नागरिकांपर्यंत पोहोचून शिबिराची माहिती दिली. तसेच शिबिर स्थळी प्रहारच्या ५० कार्यकर्त्यांनी रक्तदान केले विविध आजारांच्या रुग्णांनी नोंद करून घेतली. तर याही पेक्षा महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे तपासणी नंतर जवळपास दोन हजारापेक्षा जास्त रुग्णांना डॉक्टरांचा सल्यानुसार मोफत औषध वाटप करण्यात आले. या प्रसंगी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी आ. बच्चूभाऊ कडू व त्यांचे खंदे कार्यकर्ता संजय देशमुख मा.जि.प.सदस्य तथा मा.विदर्भ प्रमुख प्रहार यांच्या रुग्णसेवेचे भरभरून कौतुक करत आभार मानले. या आरोग्य रोग निदान शिबिरात मेडिसिन तज्ञ,स्त्रीरोग तज्ञ,अस्थिरोग तज्ञ, नेत्र तज्ञ,बालरोग तज्ञ,दंतरोग तज्ञ, न्युरोलॉजी तज्ञ, शैल्यचिकित्सक तज्ञ,कान,नाक,घसा,मेंदू शस्त्रक्रिया(ब्युअरो सर्जन),किडनी रोग तज्ञ,हृदयरोग चिकित्सक या विविध आजारांच्या तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी व उपचार करून योग्य सल्ला देऊन पुढील उपचाराकरिता मार्गदर्शन केले विशेष बाब म्हणजे या शिबिरात तपासणी दरम्यान रुग्णांची बीपी,शुगर व इसीजी या तपासणी सुद्धा मोफत करण्यात आल्या. तपासणी झालेल्या सर्व आजारातील रुग्णांना आवश्यकता भासल्यास पुढील उपचाराकरिता योग्य सल्ला व मार्गदर्शन करून शालिनीताई मेघे हॉस्पिटल रिसर्च सेंटर नागपूर येथे नेण्यात येणार आहेत. रुग्णांचा उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेस केल्या जाणार असून योजनेत न बसणाऱ्या आजारांची उपचार आयोजका तर्फे तारीख देऊन मोफत करण्यात येतील. त्यांची येण्या-जाण्यास राहण्याची व भोजणाची व्यवस्था सुद्धा आयोजका तर्फे मोफत करण्यात येणार आहे. या आरोग्य महाशिबिरात मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया,उपचार व औषध वाटप शिबिराचा यशस्वीते करिता आयोजक संजय देशमुख मा.जि.प. सदस्य तथा मा.विदर्भ प्रमुख तसेच शेकडो कार्यकर्ते यांनी पुढाकार घेऊन यशस्वीरीत्या पार पडला.

# रिद्धपूर येथील पथदिव्यांच्या कामाची चौकशी करा

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक रिद्धपूर**

श्रीक्षेत्र रिद्धपूर येथेअंदाजे पाच लाख रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकास निधींतर्गत एलईडी पथदिवे लावण्यात आले असले, तरी अनेक ठिकाणी हे काम रेंगाळले आहे. तसेच काही ठिकाणी दोन वेळा निधी खर्च केला जात आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

ग्रामपंचायतीने जनसुविधेंतर्गत २ लाख रुपयांचे २०० व्हॅटचे १४ पथदिवे बाजार चौक येथे लावले होते. आतादेखील संबंधित कंत्राटदाराने याच चौकात पुन्हा एलईडी लावले आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी दोन वेळा निधी खर्च होत आहे, तर दुसरीकडे आवश्यक असतानाही पथदिवे लागलेले नाहीत. याशिवाय १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधूनसुद्धा अंदाजे ५ लाख रुपयांचे पथदिवे महावितरणच्या विद्युत खांबांवर ग्रामपंचायतीने लावले आहे. त्यामुळे ४ महिन्यांपूर्वी संबंधित कंत्राटदाराने पथदिवे कोणकोणत्या ठिकाणी लावले, याबाबतची चौकशी केल्याशिवाय देयक देऊ नये, अशी मागणी रिद्धपूर येथील शिवसेनेचे मंगेश शेळके, सचिन डवके, प्रवीण जावरकर, मनोज वानखडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली.




# रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा होताच अमरावतीमध्ये आंनदोत्सव



## डीजे ची धूम,फटाख्यांची आतिषबाजी,मोतीचुर लाडूंचे वाटप

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**
प्रभू श्रीरामांचे अयोध्या येथे तब्बल पाचशे वर्षांनंतर भव्यदिव्य राम मंदिर साकारण्यात आले आहे. या मंदिरात सोमवार, २२ जानेवारी रोजी रामलल्लांची प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडताच अमरावती शहराच्या राजकमल चौकात भव्य दिव्य असा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी जिल्ह्यातील समस्त हिंदू बांधव, विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष राजकमल चौकात एकवटले होते. यासोबतच खेडी असो वा शहर, प्रत्येक मंदिर आकर्षक रोषणाईने उजळून निघाले आहे. घराघरांवर लावण्यात आलेले भगवे झेंडे, पताका आणि श्रीरामांच्या ध्वजाने नागरीवस्त्या राममय झाल्या असून, भक्तांमध्ये दिवाळीसमान आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

प्राचीन अंबादेवी- एकवीरादेवी मंदिर मकर संक्रांतीपासूनच रोषणाईने सजले असून, सकाळी-संध्याकाळी पूजाअर्चा, प्रसाद वाटप निरंतरपणे सुरू आहे. सराफा बाजारातील काळाराम मंदिर, राजापेठ आणि बडनेरा येथील गुरुद्वारांवर आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. जुने कॉटन मार्केट परिसरातील पंचमुखी हनुमान मंदिर रोषणाईने उजळले असून, अयोध्या येथून प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या थेट प्रक्षेपणाची व्यवस्था करण्यात आली होती. बडनेरा येथील यवतमाळ मार्गालगतच्या झिरी येथील राम मंदिर, दत्त मंदिर, जुनीवस्ती स्थित गोडबोले यांच्या निवासस्थानी श्रीराम मंदिर यासह जिल्ह्याभरात मंदिरांमध्ये भजन, दीपोत्सव, महाप्रसाद व राम यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच श्रीराम रथयात्रा, शोभायात्रा, गीत रामायण, कीर्तन, सुंदरकांड, हनुमान चालिसा पठण, महाआरती, पालखी सोहळा, रांगोळी स्पर्धा, श्रीराम कथा चित्र रेखाटन स्पर्धा, महाप्रसाद असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात राजकमल चौक,चौक, गांधी चौक यासह अन्य ठिकाणी पाच हजार किलो बुंदी लाडू वाटप होणार आहे. शहरातील राजकमल - चौक, राजापेठ, जयस्तंभ चौक, गांधी या प्रमुखचौक या प्रमुख चौकात रामलल्लांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा थेट बघता यावा, यासाठी मोठे स्क्रिन लावले होते.

**संपूर्ण देशासाठी ऐतिहासिक सुवर्ण क्षण : आमदार प्रवीण पोटे पाटील**

ज्या क्षणाची संपूर्ण देश आतुरतेने वाट पाहत होते तो सुवर्ण क्षण आला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आज शुभ मुहूर्तावर श्री रामांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली राजकमल चौक अमरावती येथे प्रतिष्ठापना प्रक्षेपण मधे भाजपा शहर अध्यक्ष आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी उपस्थित राहून या सुवर्ण क्षणाचे साक्षीदार झाले.

प्रभू श्रीरामाचे आदर्श आणि विचार भारताच्या आत्म्यात वास करतात. त्यांचे चरित्र आणि जीवनाचे तत्वज्ञान हे भारतीय संस्कृतीचा आधारस्तंभ आहेत. श्री राम मंदिर उभारणीमुळे पवित्र भूमी अयोध्या पुन्हा एकदा संपूर्ण वैभवाने जगासमोर येईल.या भव्य भगवान श्री राम मंदिराच्या उभारणीतून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे कणखर आणि निर्णायक नेतृत्व दिसून येते. आज अतिशय लोभस श्री रामाचे दर्शन झाले माझे जीवन कृतकृत्य झाले असे मत यावेळी आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी व्यक्त केलेया प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी लाडूच्या प्रसादाचे व मिठाईचे वाटप करत आनंदोत्सव साजरा केला यावेळी जयंत डेहनकर, रवींद्र खांडेकर, तुषार भारतीय, चेतन पवार, चेतन गावंडे, विवेक कलोती, कौशिक अग्रवाल, अनिता राज , सुरेखाताई लुंगारे, गंगाताई खारकर गजानन देशमुख, मंगेश खोंडे यांसह संपूर्ण भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# हनुमानगढीवर अभूतपूर्व सोहळा

## राणा दाम्पत्यांनी केले भगवान श्रीरामाचे विधिवत पूजन

### हजारोंच्या उपस्थितीत हनुमान चालीसाचे पठण



**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**
अमरावतीच्या हनुमान गढीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन आज सकाळ पासूनच करण्यात आले आहे. संत-महंत, आमदार रवी राणा, खासदार नवनीत राणा, समाजसेवक चंद्रकुमार उपाख्य लप्पीभय्या जाजोदिया यांच्या उपस्थितीत सामूहिक हनुमान चालिसा पठण करून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली त्यानंतर महाआरती करण्यात आली याठिकाणी ११ लाख लाडूंचा विश्वविक्रमी भव्यदिव्य लाडू बनविण्यात आला आहे. संध्याकाळी सहा वाजता राम दिवाळी साजरी करण्यात येणार असून आतषबाजी करण्यात येईल. एक दिवा रामनामाचा अभियान्यांतर्गत : १ लाख दिवे हनुमान गढी येथे प्रज्वलित करण्यात येऊन



दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे सायंकाळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा या ठिकाणी येणार असून कारसेवकांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# तीन हजार मातृशक्ती व एक हजार विद्यार्थिनींकडून एक लक्ष रामरक्षा पठण; अकोला शहर राममय, भाविक भक्तीत तल्लीन

**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अकोला**
अयोध्या येथील राम मंदिरात प्रभू श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त अकोला शहर व जिल्हा राममय झाला आहे. शहरातील मंदिरे व प्रमुख चौक भगवामय झाले आहेत. बिर्ला राममंदिर येथे नीलेश देव मित्र मंडळाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात तीन हजार महिला व एक हजार विद्यार्थिनींकडून एक लक्ष वेळा रामरक्षा पठण करण्यात आले.



अयोध्या येथील राम मंदिरात प्रभू श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त अकोला शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील बिर्ला राम मंदिरात तीन हजारावर महिला आणि एक हजार शाळकरी विद्यार्थिनींनी अत्यंत लयबद्ध सादरीकरणातून एक लाख वेळा रामरक्षा पठण केले. गेल्या काही दिवसांपासून या सोहळ्याची तयारी करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह, संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष डॉ. राजकुमार हेडा, आयोजक नीलेश देव, नरेश बजाज आदींसह आयोजन समितीचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते. शिस्तबद्धरित्या महिलांनी रामरक्षा पठण सोहळ्यात सहभाग घेतला. या सोहळ्यात सहभागी महिलांना किटचे वाटप केले. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी पोलिसांकडून चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. रामरक्षा पठणानंतर हजारो राम भक्तांना महाप्रसादाचे वितरण केले, अशी माहिती ड. धनश्री देव सेवा स्मृती प्रकल्पाद्वारे देण्यात आली.

जिल्ह्यातील सर्वच मंदिरांमध्ये भजन, कीर्तन, नामस्मरण, हनुमान चालिसा पाठ, सुंदर कांड करून महाप्रसादाचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. घर, मंदिरांवर ध्वज लावण्यात आले आहेत. चौका-चौकांमध्ये भगव्या पतका लावण्यात आल्या आहेत. आयोध्या येथील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर शहरात ठिकठिकाणी जोरदार आतषबाजी करण्यात आली. जिल्ह्यातील २५ हजार मंदिरांवर रोषणाई करण्यात आल्याची माहिती आमदार रणधीर सावरकर यांनी दिली.

# हंगाम संपल्यावर संत्री निर्यात अनुदान योजना लागू; शेतकऱ्यांमध्ये रोष



**दि.२२विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**
बांगलादेशने आयात शुल्कात भरमसाठ वाढ केल्याने राज्य सरकारने संत्र्याच्या निर्यातीवर ५० टक्के अनुदानाची घोषणा केली होती. त्यानुसार आता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्या, तरी त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.

बांगलादेशने संत्र्याच्या आयात शुल्कात वाढ केल्यामुळे महाराष्ट्रातून होणारी संत्रा निर्यात प्रभावीत झाली. ८८ रुपये प्रति किलो असे आयात शुल्क बांगलादेशकडून आकारले गेले. त्यामुळे देशांतर्गत बाजारातील दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाली. राज्य सरकारने आयात-निर्यात धोरणात हस्तक्षेप करावा किंवा निर्यात अनुदान जाहीर करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती.

पणन संचलनालयाच्या संनियंत्रणात या अनुदान योजनेची अंमलबजावणी होणार ४४ रुपये प्रति किलो अनुदान दिले जाणार आहे. राज्य सरकारने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात अनुदानाची घोषणा केली. त्यानंतर आता शासन आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी प्रक्रिया संस्था तसेच निर्यातदार हे निर्यात अनुदानासाठी पात्र ठरणार आहेत.

बांगलादेशने संत्र्याच्या आयात शुल्कात वाढ केल्यामुळे महाराष्ट्रातून होणारी संत्रा निर्यात प्रभावीत झाली. ८८ रुपये प्रति किलो असे आयात शुल्क बांगलादेशकडून आकारले गेले. त्यामुळे देशांतर्गत बाजारातील दरात मोठ्या प्रमाणात घसरण झाली. राज्य सरकारने आयात-निर्यात धोरणात हस्तक्षेप करावा किंवा निर्यात अनुदान जाहीर करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली होती.

# मराठा समाजाचे मागासलेपण तपासणीस प्रारंभ

## प्रगणकाला सहकार्य करा; जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे आवाहन

**दि.२२ विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**
राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे मागासलेपण तपासणी सर्वेक्षणाचे काम २३ ते ३१ जानेवारीदरम्यान करण्यात येणार आहे. या तपासणीसाठी येणाऱ्या प्रगणकाला नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले आहे.

राज्यातील सर्व ग्रामीण व शहरी भागातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाचे हे काम २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना राज्य मागासवर्ग आयोगाने दिल्या आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वेक्षणाबाबत नागरिकांना माहिती व्हावी तसेच सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या प्रगणकाला प्रत्येक घरातून अचूक माहिती दयावी, असे आवाहन केले आहे. मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्यासाठी तहसिलदार यांच्या नियंत्रणाखाली प्रगणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती केली आहे. हे २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत सर्वेक्षण करणार आहेत. तरी नागरिकांनी सर्वेक्षण कालावधीत घरी उपस्थित राहून सर्वेक्षण करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकाला सहकार्य करावे , असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे( निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजातील मराठा-कुणबी, कुणबी -मराठा, आणि कुणबीच्या नोंदी शोधण्याकरिता सप्टेंबर २०२३ मध्ये शासनाने समिती तयार केली. या समितीने महाराष्ट्रभर कुणबी जातीच्या नोंदी शोधण्याकरिता विशिष्ट कार्यक्रम राबवून त्याप्रमाणे मोठ्या प्रमाणात नोंदी शोधण्याची कार्य अमरावती जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर आणि विविध विभागांच्या माध्यमातून केले. या शोध मोहिमेतून जिल्हाभरात ७ लाखांपेक्षा जास्त कुणबी नोंदी शोधण्यात आल्या. जिल्हा प्रशासनातर्फे या सर्व नोंदी रीरींरींळ.सीं.ळप या अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. जिल्हा प्रशासनातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपणास आवश्यक असणाऱ्या कुणबी नोंदी या संकेतस्थळास भेट देऊन प्राप्त करून घ्याव्यात व कुणबी प्रमाणपत्रासाठी सक्षम प्राधिकारी तथा आपले उपविभागीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

# रामो विग्रहवान् धर्मः



# श्रीरामोत्सव

## राम मंदिर प्राण-प्रतिष्ठापूजन निमित्त हार्दिक शुभेच्छा!

**सांध्य दैनिक - विदर्भ प्रजासत्ताक**